सन २०२२ - २३ पासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेच्या दरात सुधारणा करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग

शासन निर्णय क्र. पुरक-२०२२/प्र.क्र.९/शिक्षण-२,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ३२.

२४ मार्च, २०२३

संदर्भ :

१. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्र. इबीसी-२००३/प्र.क्र. ८९/ मावक-२. दि. ३१.०३.२००५

२. विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, क्र. शिवृती २०१८/प्र.क्र. २८३/ शिक्षण, दि. ३०.०१.२०१९

३. सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्र. इमाव-२००३/प्र.क्र. २०१/ मावक-[illegible] दि. २५.०७.२००३

**प्रस्तावना:-** राज्यातील मागासवर्गीय (इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग) मुलींचे प्राथमिक व माध्यमिक शाळांतील गळतीचे प्रमाण रोखण्याच्या दृष्टीकोणातून इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी च्या मुलींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकत असणा-या इतर मागास प्रवर्गातील मुलींना (२२२५ एफ २४५), इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकत असणा-या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. (२२२५ एफ २७२) व इयत्ता ८ वी ते १० मध्ये शिकत असणा-या विजाभज व विमाप्र मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती येजना (२२२५ ई ९८२) या लेखाशिर्षाखालील शिष्यवृत्ती दरांमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मॅट्रिकपूर्व योजनेची इयत्ता ५ वी ते ७ मध्ये शिकत असणा-या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लेखाशिर्ष २२२५ एफ २४५, इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकत असणा-या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई शिष्यवृत्ती योजना लेखाशिर्ष २२२५एफ २७२ व इयत्ता ८ वी ते १० मध्ये शिकत असणा-या विजाभज व विमाप्र मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती येजना लेखाशिर्ष २२२५ ई ९८२ अंतर्गत शिष्यवृत्तीमध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. :-

(रुपयात)

| अ.क्र | योजनेचे नाव | लेखाशिर्ष | प्रचलीत शिष्यवृत्ती | सुधारित दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकत असणा-या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. | २२२५ एफ २४५ | ६०/- | २५०/- |
| २. | इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकत असणा-या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. | २२२५ एफ २७२ | १००/- | ३००/- |
| ३. | इयत्ता ८ वी ते १० मध्ये शिकत असणा-या विजाभज व विमाप्र मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती येजना. | २२२५ ई ९८२ | १००/- | ३००/- |

०२. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांनी केलेल्या विनंतीनुसार उपरोक्त तक्त्यातील नमूद २२२५ एफ २४५, २२२५ एफ २७२ व २२२५ ई ९८२ या लेखाशीर्षांतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातून उपरोक्त तक्त्यामधील रकाना क्र. ७ नुसार रु. १८,५०,००,०००/- (रुपये अठरा कोटी पन्नास लक्ष फक्त) इतकी रक्कम अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

०३. याकरीता संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी व उप सचिव (अर्थसंकल्प), इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(व.सु.सावंत)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प कक्ष), इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. निवडनस्ती (शिक्षण -२)